# संप्रेषण माध्यमांचा विचार

**डॉ. गामा मुकुंदराव सेलोकर**
प्रभारी प्राचार्य
श्रीमती सुग्रता वंजारी महिला महाविद्यालय
वडोदा, ता. कामठी, जि. नागपूर.
9823521187,
gamaselokar20@gmail.com

**प्रस्तावना :—**

संप्रेषण (कम्युनिकेशन) हा मानवी संस्कृतीचा एक महत्वाचा घटक आहे. दैनंदिन जीवनात आपण एकमेकांना नेहमी काही ना काही सांगण्यासाठी उत्सुक असतो. हवामान, बाजारभाव, राजकीय —सामाजिक —आर्थिक उलाढाली, कौटुंबिक अडचणी, आपल्याला आलेला एखादा चित्तथरारक अनुभव अशा वेगवेगळया घटनांबाबत आपण परस्परांशी सतत बोलत असतो. हा परस्पर —संवाद आपल्या जगण्याचे एक अत्यावश्यक, अविभाज्य अंगच बनून गेले आहे. त्यामुळेच एखाद्या दिवशी आपण मौन पाळण्याचा प्रयोग केला तर आपल्याला किती चुकल्या चुकल्यासारखे होते. 'मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे' अशी माणसाची एक व्याख्या केली जाते. ही सामाजिकता संप्रेषणाशिवाय संभवूच शकत नाही.

**शोधनिबंधासाठी वापरण्यात येणारी संशोधनाची पद्धती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वापरण्यात येणारी माहिती व तथ्ये ही विषयाशी संबंधित व विविध पुस्तके, मासिके, लेख, वर्तमानपत्र व सांकेतिक स्थळावरून संकलित करण्यात आली आहे.

**संशोधनाचे उद्देश :—**

१. संप्रेषणाची अनेक माध्यमे आहेत ते जाणून घेणे.
२. संप्रेषणाची प्रगती कशी होत गेली याचा शोध घेणे.
३. संप्रेषणात बोलीभाषेचे महत्त्व काय आहे याचा अभ्यास करणे.
४. संप्रेषण (कम्युनिकेशन) हा मानवी संस्कृतीचा एक घटक आहे. याचा शोध घेणे.
५. ध्वनी हे संप्रेषणाचे एक महत्त्वाचे मूलभूत साधन आहे का याचा शोध घेणे.

**संशोधनाची गरज व महत्त्व :—**

आधुनिक युग हे माहितीचे युग आहे. लोकशाही व्यवस्थेत तर सर्वसाधारण नागरिक अत्याधुनिक ज्ञानाने संपन्न असणे, त्याला सर्व चालू घडामोडींविषयी अद्ययावत माहिती असणे आवश्यक असून तसे झाले तरच तो जबाबदार नागरिकांची भूमिका यशस्वीपणे पार पाडू शकेल. नभोवाणीचे स्थान हे महत्वपूर्ण असून देशाचे प्रत्येक कोपऱ्यात माहिती पाठविण्याचे, शोकशिके करण्याचे एक प्रभावी संप्रेषण माध्यम असून नभोवाणी या संप्रेषण माध्यमाचा भारतात विकास कसा झाला व देशात संप्रेषणाचे एक व्यापक जाळे कसे निर्माण झाले. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाचा विषय महत्त्वाचा आहे.

**संप्रेषण :—**

संप्रेषणाची अनेक माध्यमे आहेत. त्यात हावभाव, खाणाखुणा, स्पर्श, चित्कार, आरोळी, चित्र, तसबीर, तक्ता, चिन्हे, इत्यादींचा उल्लेख करता येईल. मूकबधीर व्यक्ती इतरांशी खाणाखुणांच्या माध्यमातून

संप्रेषण साधते. नवजात अर्भक रडून, हुंकार देऊन आपल्या मातेशी संवाद साधते. रस्त्यांवर वाहतुकीसंबंधी विविध प्रकारच्या खुणांचे, चिन्हांचे फलक लावलेले असतात, त्यातून वाहन–चालकांना धोक्याची वळणे, गतिरोधक, घाटाचा चढाव–उतार, इत्यादींविषयी माहिती मिळते, युद्धात पांढरे निशान फडकावले, की ती शरणागतीची सूचना समजली जाते. भित्तिचित्र, रस्त्यांच्या कडेला उभारलेले मोठे फले, शिलालेख, स्तंभ, स्तूप, इत्यादींचा वापरही संप्रेषणासाठी केला जातो.

ध्वनी हे संप्रेषणाचे एक मूलभूत साधन आहे. आदिम काळापासून त्याचा वापर होत आला आहे. क्रोधाविष्ट माणसाचे ओरडणे, शोकाकूल व्यक्तीचे रडणे, वेदनांनी तळमळत असलेल्या माणसाचे कण्हणे, हर्षभरित माणसाचे हसणे हे सर्व ध्वनी आपल्याला बरेच काही सांगून जातात. सामूहिक संप्रेषणात ढोल–नगाऱ्याचा आवाज, घंटा, भोंगा, इत्यादी आवाजांचा वापर होत आला आहे. संस्कृतीच्या वाटचालीप्रमाणे काही काही ध्वनींना विशिष्ट अर्थ प्राप्त होत गेले. नगरपरिषदेचा विशिष्ट वेळ जाहीर करणारा भोंगा, गिरणीचा भोंगा, अग्निशामक दलाच्या आगीच्या बंबाची घंटा, शाळेची घंटा अशी त्याची काही उदाहरणे सांगता येतील. ध्वनीतून जेव्हा शब्दाची निर्मिती झाली तेव्हा संप्रेषणाचे स्वरूप अधिक विकसित झाले. भाषेचा विकास होत गेला, भाषेचे शास्त्र निर्माण होत गेले, त्याप्रमाणात संप्रेषणही अधिक समर्थ होत गेले. भाषेच्या माध्यमातून माणूस आपल्या मनातील गुंतागुंतीच्या, सूक्ष्म भावना, जीवनाविषयी गूढ अनुभव, विविध विषयांवरील निरीक्षणे –माहिती इतरांपर्यंत पोहचवू लागला. शब्द लिखित स्वरूपात साकार झाला, लिपीचा विकास होत गेला आणि या संप्रेषणाच्या कक्षा अधिक रूंदावल्या.

मात्र मुद्रणाचा शोध लागेपर्यंत लिखित संप्रेषणही मर्यादित स्वरूपाचे होते. सर्व पुस्तके, ग्रंथ, काव्यसंग्रह हाताने लिहून काढावी लागत. त्यात बराच कालावधी जात असे आणि त्याला खर्चही खूप येत असे. त्यामुळे पुस्तक व्यवहार मर्यादित होता. मोठमोठे राजे –रजवाडे, सरदार –दरकदार, श्रीमंत यांनाच पुस्तके आपल्या संग्रही बाळगणे शक्य होत असे. परंतु मुद्रणकलेचा शोध लागला आणि ग्रंथव्यवहार झपाट्याने वाढू लागला, अगदी कमी कलावधीत शेकडो, हजारो पुस्तके छापता येऊ लागली, त्यांच्या किमतीही कमी झाल्या, त्यामुळे ज्ञानाचे भांडार फार मोठया जनसमूहापर्यंत पोहोचू लागले. मुद्रणकलेचाही विकास होत गेला आणि वर्तमानपत्रे, नियतकालिके, पुस्तिका, घडीपत्रके, इत्यादी स्वरूपात आता ज्ञानाचा जणू स्फोटच होऊ लागला आहे. सामूहिक संप्रेषणाचे माध्यम म्हणून भाषेला वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे.

अर्थात, लिखित संप्रेषणाचा हा सर्व व्यवहार साक्षर लोकांपुरताच मर्यादित आहे. ही सर्व नियतकालिके, वर्तमानपत्रे, पुस्तके ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यात पोहोचू शकत नाहीत आणि पोहोचली तरी साक्षर व्यक्तींनाच त्याचा काय तो उपयोग होणार.

बोलीभाषेचे मात्र तसे नाही, ती निरक्षर माणसालाही आपल्या कक्षेत घेऊ शकते. १८७६ साली ग्रॅहॅम बेलने दूरध्वनीचा शोध लावला. तारेच्या माध्यमातून शब्द एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ऐकू येऊ लागला. १८९५ साली मार्कोनी या इटालियन शास्त्रज्ञाने बिनतारी संदेश –यंत्रणेचा शोध लावला आणि माणसाचा शब्द नद्या–नाले, समुद्र, डोंगरदऱ्या, रानेवने, इत्यादी अडथळे ओलांडून हजारो मैल दूर ऐकता येणे शक्य झाले. मानवी शब्दाने जणू आकाशालाच गवसणी घातली. याच क्रांतिकारी वैज्ञानिक तत्त्वाचा वापर नभोवाणी प्रसारणात करण्यात येतो. सुरूवातीला नभोवाणीचे प्रसारण माध्यम लहरी (मिडियम वेव्ह) व

Research Hub International Journal

लघुलहरी (शॉर्ट वेव्ह) या तंत्राने करण्यात येत असे. नंतर त्यात सूक्ष्म लहरी (मायक्रो वेव्ह) आणि आता फ्रिक्वेन्सी मॉडयुलेशन (एफ.एम.) या तंत्राचा वापर करण्यात येतो. या अत्याधुनिक तंत्रामुळे पावसाळी किंवा वादळी हवा, वेगवान वारे, इत्यादींचा कोणताही परिणाम प्रसारणावर होत नाही आणि स्टुडिओत उच्चारला गेलेला शब्द जशाच्या तसा श्रोत्यांपर्यंत पोहोचू शकतो. मार्कोनीने १९१८ साली सप्टेंबर महिन्यात इंग्लंडकडून ऑस्ट्रेलियाला पहिला रेडिओ–संदेश पाठवला. १९२१ साली अमेरिकेत पीटस्‌बर्ग येथे जगातील पहिले नभोवाणी केंद्र स्थापन करण्यात आले. तेव्हापासून सुरू झालेला नभोवाणीचा प्रवास आता फार प्रगत अवस्थेत येऊ न पोहोचला आहे. महाभारतात, दिव्यदृष्टी लाभलेल्या संजयाने आंधळया धृतराष्ट्राला युद्धभूतीवरील घटनांचे प्रत्यक्ष वर्णन करून सांगितल्याची कथा तुम्हांला ठाऊक आहे. नभोवाणीची भूमिका या संजयासारखीच आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटनांची माहिती बातम्यांच्या रूपाने नभोवाणीवरून सांगितली जाते. त्याचबरोबर भाषणे, चर्चा, मुलाखती, पत्रके, नभोवाणी वृतांत, वार्ताचित्र अशा विविध कार्यक्रमांद्वारे सर्व जगच आपल्या घरात ध्वनिलहरींवरून आणले जाते. त्याशिवाय संगीत, नभोनाटय, इत्यादींद्वारा श्रोत्यांचे मनोरंजनही करण्यात येते.

ओरडणे, विव्हळणे, चित्कारणे, इत्यादी नुसत्या ध्वनीच्या माध्यमापासून सुरू झालेला संप्रेषणाचा प्रवास आता अतिशय गुंतागुंतीच्या, विकसित अशा भाषेच्या वापरापर्यंत येऊन पोहोचला आहे. विज्ञानाच्या साहाय्याने तर एका ठिकाणी उच्चारलेला शब्द त्याच क्षणी कोटयवधी श्रोत्यांपर्यंत नेऊन पोहोचविणे शक्य झाले आहे. त्यामुळे लिखित भाषेबरोबरच बोलीभाषा हे देखील जनसंप्रेषणाचे एक प्रभावी, परिणामकारक साधन बनले आहे. आपल्या देशात निरक्षरांचे प्रमाण अद्यापही मोठे आहे, त्यामुळे तर नभोवणी –संप्रेषणाचे महत्व कैकपटीने वाढले आहे. भारतभूमीत मौखिक परंपरा फार पुरातन आहे. किंबहुना आपल्याकडे वेदादी शास्त्रे व संगीतादी कलांचे जतन या मौखिक परंपरेनेच केले आहे. वेदाभ्यासात उच्चारणाला विशेष महत्व आहे आणि त्यांचे शिक्षण प्रत्यक्ष गुरूमुखातूनच घ्यावे लागते. शेकडो वर्षे, पिढयानपिढया याच मार्गाने हे ज्ञान आपल्यापर्यंत चालत आले आहे. संगीताबाबतही हेच म्हणता येईल. स्वराची साधना, स्वराचा सच्चा लगाव, रागस्वरूपाची शुद्धता, लयकारी या सर्वासाठी गुरू –शिष्य परंपरेचाच आधार घ्यावा लागतो.

आपल्या संस्कृतीतील मौखिक परंपरेचे हे प्राबल्य इतर क्षेत्रांतही जाणवते. कीर्तनकार, प्रवचनकार, बहुरूपी, वासुदेव, चित्रकथी, गोंधळी, शाहीर हे सर्व मौखिक परंपरेचेच वाहक आहेत. त्यांच्यामुळे येथील सामान्य माणसाचे मनोरंजन आणि उद्‌बोधन असे दुहेरी पोषण होत आले आहे. अगदी सामान्य निरक्षर माणसालाही रामायण–महाभारतादी महाकाव्ये, अद्वौतादी सिद्धांत, भक्तीचे नवविधा मार्ग, नीतिमूल्यांचे विविध प्रवाह, इत्यादींविषयी पुरेशी माहिती असते ती या मौखिक परंपरेमुळेच, त्यामुळेच की काय आपल्याकडे ज्ञानी, प्रगल्भ माणसाला 'बहुश्रुत' असे म्हणतात–इंग्रजीत त्यालाच 'वेल रीड' असे विशेषण वापरण्यात येते.

**निष्कर्ष :–**

१. मनुष्य हा सामाजिक प्राणी असून शेवटी मनुष्याच्या हाताने चुका होत असतात. तसेच मानवी संस्कृतीला एक महत्वाचा घटक म्हणून संप्रेषणाला महत्त्व आहे.
२. संप्रेषणामध्ये हावभाव, खाणाखुणा, भितिचित्र, मोठे फलक, शिलालेख, स्तंभ, स्तूप यांचा संप्रेषणामध्ये वापर केला जातो.

३. संप्रेषणाचे स्वरूप अधिक विकसित होण्याकरिता ध्वनीमधून शब्दाची निर्मिती होणे महत्त्वाचे असते.
४. ज्ञानाचा जणू स्फोटच होऊन सामूहिक संप्रेषणाचे माध्यम म्हणून भाषेला वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे.
५. लिखित संप्रेषण हे साक्षर लोकांपुरतेच मर्यादित असून ग्रामीण भागात पोहोचू शकत नाहीत. आणि पोहचली तरी साक्षर व्यक्तींनाच त्याचा उपयोग होतो.
६. बोलीभाषा मात्र निरक्षर माणसालाही आपल्या कक्षेत घेऊ शकते.
७. जगातील पहिले नभोवाणी केंद्र १९२१ साली अमेरिकेत पीटसबर्ग येथे स्थापन करण्यात आले आणि आता प्रगत अवस्थेत येऊ पोहोचलेला आहे. असे आपल्याला दिसून येतो.

**उपाय योजना :—**

१. सर्व नियतकालिके, वर्तमानपत्रे, पुस्तके ग्रामीण भागात पोहोचायला पाहिजे.
२. विज्ञानाच्या साहाय्याने तर एका ठिकाणी उच्चारलेला शब्द त्याच क्षणी अनेक श्रोत्यांपर्यंत नेऊन पोहोचविणे आवश्यक असते.
३. नभोवाणीवरील शब्द हा अत्यंत प्रभावी असायला पाहिजे.
४. नभोवाणी हे देशाच्या कानाकोपऱ्यात माहिती पाठविण्याचे, लोकशिक्षण करण्याचे एक प्रभावी संप्रेषण माध्यम असल्यामुळे नभोवाणी हे महत्वाचे असून याचे जतन करायला पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. https://www.aatmmnthn.in
२. https://polytechnicpdf.com
३. https://polytechnic.pdf.com
४. प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्ये—य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक.

Research Hub International Journal